# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 31/12/2021 (शुक्रवार)

(सायंकाळ)

---

**जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद**

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 02 कि.मी. अंतरावरील मौजा मोहपा फाटा सावंगी येथे दिनांक 30/12/2021 चे 07.45 वा. ते 08.45 वा. दरम्यान सावनेर पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन सावनेर पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन सी. जी.– 04/जे.बी.–1573 क्रमांकाच्या ट्रकला थांबवुन तपासले असता वाहनाचा चालक वाहन सोडुन पसार झाला होता तर सदर वाहनात 30(बैल,गोरे) जनावरे कि. 2,85,000/–रू. निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण किंमती 22,85,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस हवालदार श्री. दिनेश काकडे, पो.स्टे. सावनेर यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1)घ,ड,च प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ),9 महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम, सहकलम 119 महाराष्ट्र पोलीस अधिनियम काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री आशिषसिंग ठाकुर मो.क्र. 9403573955 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग श्री अशोक सरंबळकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन सावनेरचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री मारुती मुळूक यांचे नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक श्री आशिषसिंग ठाकुर, सफौ अनिल तिवारी, पोलीस हवालदार दिनेश काकडे, पोलीस शिपाई रविन्द्र भलावी यांनी यशस्वीरित्या पार पाडली.






पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर